# भारतीय संघराज्य व्यवस्था आणि आपत्ती निवारणार्थ उपयोगिता व उपाययोजना

**डॉ. सचिन एस. वेरुळकर**
सहा. प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
एस. एन. मोर महाविद्यालय.
तुमसर. जि.भंडारा

***सारांश : -***

*भारतीय संविधानाच्या अनुच्छेद एक मध्ये भारताचा परिचय "India That is a Bharat shall be a Union of States" अश्या पद्धतीने करण्यात आला आहे. यात स्पष्टपणे "संघराज्याच्या " ऐवजी "राज्यांचा संघ" असे करण्यात आले आहे.[1] भारताच्या संघराज्य प्रतिमाना( मॉडेल) बाबतमोठ्या प्रमाणात चर्चा करण्यात येते. आज भारतीय संविधान सभा जरी अस्थित्वात नसेल परंतु त्या संबंधात एखादा वाद पुढे आल्यास न्यायपालिका किंवा न्याय तज्ञ संबंधित विवादाबाबत तरतुदी मागील संविधान निर्मात्यांची मूळ भावना जाणून घेऊन किंवा दुसरे म्हणजे सद्यस्थितीत त्या तरतुदीचा अर्थ कशाप्रकारे लागला जातो यासंबंधी विचार करून निर्णय घेतले जातात .*

*संविधानाच्या विविध तरतुदी व प्रतिमानाचा विचार करून त्या आधारे काही निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारतीय संघराज्य व्यवस्था आणि आपत्ती निवारणार्थ त्याची उपयोगिता यावर काही मुद्द्यांच्या आधारे चर्चा करण्याचा प्रयत्न या संशोधन लेखात करण्यात आलेला आहे.*

***बीज शब्द :*** *संविधान सभा, संघराज्य, केंद्र राज्य संबंध, आपत्ती निवारण.*

---

## पार्श्वभूमी :-

प्राचीन भारतात अनेक प्रकारचे गणराज्य अस्तित्वात होती यामध्ये एक मजबूत केंद्रीय सत्ता व त्याभोवती छोटी छोटी राज्ये वसलेली असत. ज्यामध्ये आजच्या स्वरूपात गणराज्य (संघराज्य) म्हणजे छोट्या राज्यांचे राज्य असे गृहीत धरले जात होते. 1861 मध्ये विधायी शक्ती प्रांतांना सोपवण्याचा निर्णय घेण्यात आला. भारत सरकार अधिनियम 1919 मध्ये विधानसभांना वाढीव अधिकार देण्यात आले. सोबतच आवश्यक वित्तीय शक्तीही प्रदान करण्यात आली. 1930 मध्ये सायमन आयोगाने हिंदू मुस्लीम वाद कमी करण्याच्या दृष्टीने विधानसभा व संस्थानांना यासंबंधी अधिक अधिकार देण्याचे समर्थन केले.

भारत सरकार अधिनियम 1935 मध्ये प्रांतांना स्वायत्तता देऊन संघ स्वरूपाची व्यवस्था प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. 1937 मध्ये ही व्यवस्था प्रत्यक्षात सुरू झाली. 1935 च्या कायद्याने भारतात सर्वप्रथम संघीय स्वरूपाची व्यवस्था अस्तित्वात आली.[2] भारतीय संविधान निर्माण करतांना भारत सरकार अधिनियम 1935 चे प्रतिमान म्हणून पुढे होतेच तसेच संविधान निर्मितीच्या वेळी तेच लागू होते. यामुळे संघराज्य व्यवस्थेचा अनुभव भारतीयांना आल्यामुळे त्याच प्रकारची संघात्मक रचना करण्यात यावी या बाबतीत एकमत दिसते.

भारतीय संविधानामध्ये संघ म्हणजेच *फेडरेशन* याचा स्पष्ट उल्लेख कुठेही नाही. पण भारत *राज्यांचा एक संघ* म्हणजेच "युनियन ऑफ द स्टेट" असा उपयोगात आणण्यात आला. अमेरिकेमध्ये सुद्धा त्यांच्या संविधानामध्ये संघराज्य असा शब्द वापरण्यात आला नाही. 19 व्या शतकात लॉर्ड ब्राईस यांनी म्हटले होते की "संघराज्य एक राजकीय अविष्कार आहे. त्याचा उद्देश राष्ट्रीय एकता आणि राज्यांचे अधिकार कायम ठेवण्यासाठी एक सामंजस्य तयार करणे असते"[3]

संघाच्या बाबतीत याचा अर्थ प्रत्यक्षात झालेल्या समझोता किंवा कराराच्या स्वरूपात अस्तित्वात आलेली व्यवस्था जशी की अमेरिकेत राज्यांच्या मध्ये झालेल्या कराराच्या द्वारे अस्तित्वात आलेली व्यवस्था होय. हेच प्रतिमान जागतिक स्तरावर संघराज्य व्यवस्थेसाठी वापरण्यात येते. भारतीय संघाच्या बाबत हे प्रतिमान योग्य नाही कारण भारतीय संघ हे ब्रिटिश साम्राज्याच्या केंद्रीय प्रवृत्तीतून अस्तित्व आले आहे. म्हणजेच यामध्ये प्रथम भारतीय एकात्मतेचा विचार करण्यात आलेला असून प्रशासकीय सुविधेच्या दृष्टिकोनातून छोट्या छोट्या घटक राज्याची निर्मिती करण्यात आली आहे.

भारतीय संविधान राज्यांच्या बाबत 'शक्तीच्या विभागणी' बाबत उल्लेख करीत नाही तर संविधानाच्या भाग 11 मध्ये देण्यात आले आहे की, *संघ आणि राज्यांच्या मध्ये संबंध* याअंतर्गत अध्याय 14 शीर्षक विधायक संबंध तसेच उपशीर्षक '*विधायी शक्तींचे वितरण* 'असे करण्यात आले आहे. म्हणजेच केवळ सत्तेचे विभाजन न करता त्या सत्तेचे वितरण करण्याबाबत व्यवस्था भारतीय संविधानाने स्वीकारली आहे.[4]

भारतीय संविधानाच्या अकराव्या भागात *युनियन* म्हणजे *संघटन* शब्दाचा प्रामुख्याने वापर केला आहे. *फेडरेशन* हा शब्द वापरणे टाळले आहे. संविधानाच्या पहिल्या भागामध्ये ज्यात *संघ आणि त्याचे राज्य क्षेत्रासंबंधी* समाधान करण्यात आले असून भारताला एका '*राज्याचा संघ*' (युनिअन ऑफ द स्टेटस )असे नाव दिलेले आहे. भारताच्या संविधानात कुठेही संघराज्य असे शब्द प्रयोजन करण्यात आले नाही. याचे अनेक उदाहरणे आहे जसे की भारतीय सर्वोच्च न्यायालयाला 'संघीय न्यायालय' (फेडरल कोर्ट) असे न म्हणता 'सर्वोच्च न्यायालय'(सुप्रीम कोर्ट) असेच म्हटले जाते. संपूर्ण भारतभर असणाऱ्या दंड संहिता देखील एकाच प्रकारची असून त्यामुळे देशभरात कायद्याबाबत मोठ्या प्रमाणात समानता दिसते.

संविधान सभेच्या 13 डिसेंबर 1946 च्या सभेत पंडित नेहरू द्वारा ठेवण्यात आलेल्या प्रस्तावाची सुरुवात वाचनाच्या रूपात अशा स्वरूपात केली आहे "वादांपासून दूर राहण्यासाठी परिपक्वता पूर्ण चर्चा व प्रयास यांच्या आधारे अनेक गोष्टींचा वापर करण्यात आला. त्यामध्ये *भारत एक गणराज्य* हा शब्द वापरण्यात आला तसेच *समाजवाद* हा शब्द वापराणे काही सदस्यांच्या संभावित आपत्तीच्या कारणाने सुचविण्यात आला नाही. जेणेकरून यावर एकवाक्यता असावी. याच प्रस्तावात *युनियन* हा शब्द ठेवण्या संबंधी किंवा लक्ष देण्यासंबंधी जबाबदारी डॉ. आंबेडकरांना देण्यात आली होती.[5]

17 डिसेंबर 1946 ला संविधानसभेच्या प्रस्तावावर भाषण करताना आंबेडकरांनी स्पष्ट केले की, "मला वैयक्तिक स्तरावर चिंता वाटते कि, मी मजबूत एकिकृत भारत निर्माण करू इच्छितो ज्याच्या केंद्रास अधिक मजबूत रचना असेल ज्याप्रमाणे 1935 चा भारत सरकार अधिनियम मध्ये लागू करण्यात आली होती." त्यांनी

लक्षात आणून दिले कीं, काँग्रेसचे काही नेत्यांनी मजबूत केंद्राच्या बाबत विचार बाजूला ठेवला होता.त्यामागे त्यांना वाटत होते की बहुसंख्य हिंदूकडून अल्पसंख्यांना न्याय मिळणार नाही म्हणून राज्य विधानमंडळाना अधिक अधिकार देऊन हे संतुलन साधले जाऊ शकेल .परंतु पाकिस्थानच्या स्थापनेने या स्थितीत बदल झाला. [6]

1935 च्या कायदयामध्ये अतिशय मजबूत अशा केंद्रीय व्यवस्थेची निर्मिती करण्यात आली होती. भारतीय संविधान निर्माण करण्याच्या वेळेस सुद्धा 1935 चा कायदा लागू होता. त्यामुळे भारताच्या अखंडतेबाबत चौकस असणाऱ्या लोकांना भविष्यात अशाच प्रकारच्या केंद्राच्या निर्मितीची अपेक्षा होती. संविधान निर्माण होत्यावेळेस प्रारुप समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी म्हटले होते की " संविधानाची रचना परीसंघात्मक आहे की, समितीने या शब्दाचा प्रयोग हेतुपुरस्कर केला. भारतीय परीसंघ घटक राज्याच्या मध्ये कराराच्या स्वरूपात अस्तित्वात आला नाही. दुसरा घटक सरकारांना संघाच्या बाबतीत कुठल्याही प्रकारे कराराच्या स्वरूपात अस्तित्वात न येता ते प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने निर्माण करण्यात आले आहे. त्यांना संघापासून अलग होता येणार नाही.[8] यानंतर न्यायालयाने ही एका निकालात स्पष्ट केले की राज्यांना नंतर संघापासून वेगळे होण्याचा अधिकार नाही. कन्हय्यालाल मुन्शी यांच्या नुसार "भारताच्या इतिहासात स्वर्ण काळ त्या वेळी होते, जेव्हा केंद्रीय सत्ता मजबूत होती व सर्वात दुखःद काळ हा केंद्रीय सत्तेच्या कमजोरीचा होता असे म्हटले." त्यांनी सदस्यांना केंद्राला कमजोर करणाऱ्या चुकी पासून दूर राहण्यास सांगितले. तिसरी गोष्ट एक महत्त्वाची होती की ज्यामध्ये मजबूत केंद्राची आवश्यकता होती ती म्हणजे देशी संस्थांच्या समस्या ही संस्थाने नेहमीच आपले स्वातंत्र्य व स्वायत्तता याच्या बाबत प्रयत्नात होते. त्यामुळे अखंड भारत निर्माण करणे अतिशय अवघड होते. काही संस्थान स्वतःला स्वातंत्र्य घोषित करत होते. तर काही पाकिस्तानला जाऊन मिळण्याचे प्रयत्न केले अशा पृष्ठभूमीवर मजबूत केंद्र असणारी संघात्मक व्यवस्था निर्माण करणे अत्यंत आवश्यक होते.[9]

भारत एक संघ आहे यावर अधिक दबाव देऊन त्याचा उपयोग केला जातो. यामध्ये भारताच्या अन्य घटक राज्यांत द्वारे कुठल्याही प्रकारच्या सौदेबाजी किंवा कराराच्या आधारावर भारतीय संघ राज्य निर्माण झाले नसून, संविधान सभेत द्वारे स्पष्ट घोषणा करण्यात आली की, "आपली शक्ती व प्राधिकार भारताची संप्रभुता संपन्न जनतेच्या आधिन राहुन प्राप्त झाली असून यामुळे कोणतेही राज्य संघापासून अलग होऊ शकत नाही. संसद आपल्या मर्जीने संविधानाच्या अनुसूची दोन मध्ये निर्धारित राज्य क्षेत्रांमध्ये परिवर्तन करू शकतात." डॉ. आंबेडकर नुसार अमेरिकी संविधान एका करार अंतर्गत निर्माण झाले असून संघ कायदेमंडळाला घटक राज्यात बदल करण्याचा अधिकार नसून त्यात राज्ये हे अविनाशी आहे. भारताच्या संविधानामध्ये राज्याच्या अविनाशीत्वाची याबाबत कुठलीही हमी देण्यात आली नाही.[10]

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 3 नुसार संसद कोणत्याही राज्यामध्ये त्याचे क्षेत्र त्याचे नाव बदलू शकते किंवा त्याला दोन किंवा अनेक राज्यांमध्ये वाटू शकते, मिळऊ शकते, कुठल्या राज्याचे क्षेत्र वाढू शकते किंवा कमी करू शकते या प्रकारे राज्य क्षेत्रात अखंडत्व किंवा त्याच्या अस्तित्व कायम ठेवून याबाबत कुठलीही हमी भारतीय संविधानामध्ये राज्यांना देण्यात आली नाही. यासंबंधी बिरुवाडी विरुद्ध भारत सरकार यामध्ये 1950 या प्रकरणात म्हणण्यात आले की भारतीय राज्य क्षेत्रात कुठल्याही प्रकारचे बदल करण्याचा अधिकार केंद्राला म्हणजेच भारतीय संसदेला असून संसदेत भारतीय राज्य क्षेत्राला कुठल्या विदेशी राज्याला समर्पित करण्याची

शक्ती सम्मिलित नाही. म्हणजेच भारत अमेरिकेप्रमाणे '*अविनाशी राज्यांचा अविनाशी संघ* 'नसून तो '*नाशवान राज्याचा अविनाशी संग* आहे'.[11]

अनुच्छेद 3 मध्ये राज्यांना आपल्या क्षेत्रातील परीवर्तना बाबत काही बोलण्याचा अधिकार देण्यात आला आहे, ज्यामध्ये प्रथम अशा प्रकारचे विधेयक जे राज्यांच्या नावांमध्ये क्षेत्रांमध्ये परिवर्तन करीत असेल ते राष्ट्रपतीच्या शिफारशीने संसदेमध्ये ठेवण्यात येईल. असे विधेयक राष्ट्रपती संबंधित राज्याच्या विधान मंडळांमध्ये त्याचे मत जाणून घेण्यासाठी पाठवेल परंतु राज्य विधिमंडळ द्वारे व्यक्त केलेले मत राष्ट्रपती किंवा संसदेवर बाध्याकारी  नसेल (बाबूलाल विरुद्ध मुंबई राज्य ए आय आर 1960) [12]

भारतीय संघराज्यात मध्ये राज्यांच्या अस्तित्वाबाबत महत्त्वपूर्ण उच्चार स्पष्ट करते की, अनुच्छेद 2 आणि 3 मध्ये राज्यांच्या स्थापना त्यांचा प्रवेश विद्यमान राज्याचे नाव क्षेत्र सीमा यांमधील बदल अनुच्छेद 368 आधी संविधान संशोधन म्हणून मानला जाणार नाही. म्हणजेच कुठल्याही विशेष प्रक्रियेच्या शिवाय अनन्यसाधारण विधान कायद्याप्रमाणे साधारण बहुमताने असे संशोधन करू शकेल. म्हणजेच भारतीय संविधानाने राज्यांच्या नावांमध्ये किंवा क्षेत्रांमध्ये बदल अत्यंत सामान्य कायद्याप्रमाणे मानले असून त्यात संविधान संशोधन म्हणून सुद्धा गणल्या जात नाही असे असले तरी वास्तवात भारतीय राज्य आपल्या भाषिक, प्रांतिक अस्मितेच्या आधारावर मोठ्या प्रमाणात राजकीय प्रभाव पाडतात. वर्तमानात बहुपक्षीय पद्धतीमुळे तसेच प्रांतीय पक्षांच्या प्रभावामुळे राज्यांची अस्मिता अधिकच प्रभावी होऊन राजकीय दृष्टीने केंद्रीय सत्ता त्यापुढे कमजोर वाटते. मध्यंतरीच्या काळात अस्थिर केंद्रीय राजकीय परिस्थितीमुळे निर्माण झालेली सरकारे प्रादेशिक पक्षांवर अवलंबिली असलेली दिसतात.[13]

भारतीय संविधानामध्ये फेडरेशन म्हणजे संघराज्य याचा वापर विशेष प्रकारच्या प्रयोजनार्थ केला गेला नाही, ज्याप्रमाणे अमेरिकन संविधानामध्ये तो अर्थ सुनियोजित अर्थाने करण्यात आला. अमेरिकेमध्ये घटक राज्यांना  वेगळे होण्याचा अधिकार देण्यात आला होता. त्याप्रमाणे कुठलाही अधिकार भारतीय संघ व्यवस्थेमध्ये राज्यांना देण्यात आला नाही. डॉ. आंबेडकरांनी भारतीय संघराज्याच्या बाबतीत स्पष्ट करताना म्हटले अमेरिकन संविधानाच्या प्रमाणे कुठलीही व्यवस्था भारतात नाही. याबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट सांगितले की ते एका मजबूत केंद्रीय सत्तेचा संघाची व्यवस्था अस्तित्वात आणू इच्छितात. तसेच काही अर्थाने भारतीय संविधान संघराज्य व्यवस्थेची निर्मिती करेल, परंतु आपात्कालीन व्यवस्थेमध्ये त्याचे रूपांतर सहज पद्धतीने 'राज्याच्या संघात' होईल यामागे देशाच्या एकता व अखंडेतेच्या बाबत त्यांनी आपली भावना व्यक्त केली.[14]

भारतीय संविधानात काही लक्षणे संघराज्याची आहे ज्यामध्ये १) दुहेरी शासन व्यवस्था २) शक्तीचे वितरण ३) लिखित संविधान ४) न्यायालयाची स्वतंत्रता दिसतात. परंतु नागरिकांबाबत दुहेरी नागरिकत्व, कायदेमंडळाच्या  द्वितीय सभागृहात राज्यांना समान प्रतिनिधित्व, तसेच राज्यांच्या अस्तित्वाबाबत कुठल्याही प्रकारे हमी सविधान देत नाही. भारत शासन अधिनियम 1935 पर्यंत भारतात पूर्णता केंद्रीकृत संविधान होते. राज्य वास्तवात केंद्रीय सरकारचे एक अभीकरण मात्र होते केंद्राकडूनच अधिकार राज्यांना देऊ करण्यात आले होते. त्यामुळे भारतात कुठल्याही प्रकारे एका *सहकारी संघात्मक व्यवस्थेचे* अस्तित्व किंवा कल्पना केल्याचे दिसत नाही. परंतु वास्तवात राजकीय परिस्थितीच्या आधारे राज्यांच्या अस्मिता व प्रादेशिक पक्षांचे राजकारण

,विविधता यांच्या आधारे *सहकारी संघाच्या* बाबत प्रकार आरोपित केला जातो. जेव्हा की भारतात कुठल्याही राज्याच्या बाबत कुठल्याही करार करून राज्य अस्तित्वात आली नाही.(अपवाद जम्मू कश्मीर व सिक्कीम) अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने अमेरिकेला '*अविनाशी राज्याचा अविनाशी संघ*' असे घोषित केले आहे.[15] भारतीय संघराज्य मध्ये काही अशी उदाहरणे आहे जी अपवादात्मक स्थितीत भारतात समाविष्ट झाली. यासंबंधी काही प्रकारचे करार सुद्धा झाले. ज्यामध्ये जम्मू आणि कश्मीर राज्य कराराने भारतात सहभागी झाले.

संघात्मक शासन प्रणाली शब्द इंग्रजी भाषेतील फेडरेशन या हिंदी शब्दाचा अनुवाद आहे फेडरेशन शब्द लॅटिन भाषेमधील 'फोडस' पासून बनलेला आहे.याचा अर्थ संधी किंवा करार असा होतो. राज्य संघराज्य म्हणून अस्तित्वात येतात ते प्रामुख्याने विविध राज्यांच्या एकत्रित कराराचे परिणाम असतात. उदाहरणार्थ अमेरिका, ऑस्ट्रेलिया,स्वित्झारलंड हे सर्वे राज्य कराराच्या अंतर्गत फेडरेशन स्वरूपात अस्तित्वात आले.

के.सी वियर नुसार "शासन प्रणालीत सरकारची शक्ती पुरेपूर वापर कोणी एक न करता विविध प्रांतांमध्ये त्याची विभागणी केल्या जाते. प्रत्येक सरकार आपल्या कार्यक्षेत्रात राहून स्वतंत्रपणे कार्य करते."

गार्नर नुसार "संघ एक अशी प्रणाली आहे ज्यात केंद्रीय व स्थानीय सरकार एकाच सार्वभौम शक्तीच्या आधीन असतात व ती आपापल्या क्षेत्रात संविधाना अंतर्गत राहून कार्य करीत असतात संघ सरकार ही केवळ एकमेव केंद्रीय सरकार नसून केंद्रीय व राज्य सरकारे एकत्रित येऊन निर्माण होतात."

हर्मन फायनर नुसार "संघात्मक राज्य ते आहे ज्यात सत्ता व शक्ती यांचा एक भाग संघर राज्यातल्या अन्य घटकांमध्ये लिहित असतात जेव्हा कि दुसरा भाग केंद्रीय संस्थांमध्ये व क्षेत्रीय घटकांमध्ये हेतुपुरस्कर स्थापित केल्या गेला असतो."[16]

संघ व्यवस्थेचे विविध प्रतिमान मॉडेल्स वर्तमानकाळात अस्थित्वात आहे. संघ व्यवस्थेमध्ये तीन प्रकारचे प्रतिमाने आढळतात. यात १) सहकारी संघ २) सौदेबाजीवाला संघ ३) एकात्म संघ यानुसार

**१) सहयोगी संघवाद** :-

संघीय संविधानात राष्ट्रीय सत्ता तथा राज्य प्रजासत्ताक च्या दाव्यांमध्ये सामंजस्य तयार करण्यासाठी प्रयत्न केला जातो. संविधानाच्या अंतर्गत असे काही तरतुदी असतात ज्यामुळे सामंजस्यावर अधिक भर टाकला जातो. केंद्र व राज्य सरकारांमध्ये सामंजस्यापूर्ण संबंधाच्या स्थापना करण्यासाठी तयार करण्यात आलेली ही प्रणाली सहकारी संघवादाच्या नावाने ओळखले जाते. यात संघीय सरकार शक्तिशाली असते तसेच राज्य सरकारे आपल्या क्षेत्रात कमजोर स्थितीत असतात परंतु दोन्ही सरकारे परस्परांवर आत्मनिर्भर असतात निर्भर असतात.

संवाद मूलभूत तत्व आहे की शक्तीचे विभाजन परंतु सहयोगी संवाद मध्ये शक्तीचे विभाजन केल्या नंतरही केंद्र व राज्यांच्या मध्ये अंतर क्षेत्रीय सहभागावर अधिक जोर दिला जातो. हा संयोग केंद्रीय व प्रादेशिक सरकारांच्या मध्ये नसून त्यास होते परस्पर संस्थांमध्ये सुद्धा सहयोगाची भावना दिसते. अमेरिका ऑस्ट्रेलिया कॅनडा तथा भारत यांच्या संघ व्यवस्थांच्या अध्ययनावर लक्षात येते की यामध्ये हे सहकारी संवादाचे लक्षण असलेली राज्य आहे. यामध्ये प्रांतीय संमेलने, मंत्री मंडळी संमेलने, ऋण परिषद, वित्तीय परिषद, राज्य आंतर आयोग या प्रकारच्या व्यवस्थांच्या अंतर्गत परस्पर सहयोग वृद्धिंगत केले जातात. भारतीय संवैधानिक व्यवस्था

राष्ट्रीय व घटक राज्य सरकारांना एक दुसऱ्यांच्या आश्रित ठेवते ज्यानुसार राज्य सरकारे परस्पर व केंद्रीय आणि राज्य सरकारांमध्ये आंतरक्रिया यांची प्रक्रिया संपन्न होऊ शकते. योजना आयोग, वित्त आयोग, राष्ट्रीय विकास परिषद अंतर राज्य परिषद उच्च स्थळ स्थायी व तदर्थ संस्थांची स्थापना तसेच संघीय व राज्य सरकारांमध्ये सहयोग यासंबंधी अनेक व्यवस्था मुळे परस्परांमध्ये सामंजस्य निर्माण होते.

**२) सौदेबाजीवाला संघ** : -

प्रादेशिक ,वांशिक व अन्य प्रकारच्या अस्मितेच्या कारणाने मोठ्याप्रमाणात राजकीय पक्ष व अन्य संघटनांच्या माध्यमाने नेहमीच केंद्रीय सरकार बरोबर कुठल्याना कुठल्या मोबदल्याच्या स्वरुपात सहकार्याची भूमिका आत्मसात केली जाते. ज्यामुळे केंद्र राज्य संबंधात सहकार्य हे अधिकाधिक सौदेबाजी करून ज्यास्तीत ज्यास्त लाभ प्राप्त करण्याचा प्रयत्नकेल्या जातात. यात केंद्र राज्य संबंधाना अनेक घटक प्रभावित करतांना दिसतात. अश्या प्रकारच्या संघराज्य व्यवस्था आशिया ,आफ्रिकी राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतात. भारतीय संघ व्यवस्थेमध्ये अशी कित्तेक वेळा प्रसंग आले जेव्हा अशा प्रकारची व्यवस्था निर्माण झाली. चौथ्या सामान्य निवडणुकांमध्ये कॉंग्रेसी पक्षांची स्थिती कमजोर झाली त्यामुळे प्रादेशिक पक्षांचा जोर वाढला. गैर कॉंग्रेसी पक्षांचे सरकार असणारे मुख्यमंत्र्यांनी आपल्या प्रांतांची अस्मिता अधिकच प्रखर करून छोट्या छोट्या विषयांना अधिकच महत्त्व दिले.प्रत्येकवेळी केंद्र राज्य संबंधात अधिकाधिक लाभ आपल्या पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न राज्याकडून चालू झाले. यात पंजाब, पं बंगाल, तामिळनाडू व केरळ यांचा प्रामुख्याने सहभाग होता. यामुळे मॉरीस जोन्स यांनी “भारतीय संघ व्यवस्थेला सौदेबाजी वाला संघ असे म्हटले’.”[17]

**३) एकात्मक संघवाद** :-

प्रा.विलॉबीच्या नुसार संघाच्या स्थापनेच्या सोबतच राष्ट्रीय भावनेला महत्त्व प्राप्त होते व त्याच्या आवश्यकतेनुसार केंद्रीय सरकार शक्ती वाढू लागते ज्यामुळे राज्याना त्रास होऊ लागतो. संघाच्या स्थापनेनंतर काही असे परिवर्तन प्रारंभ होतात जे संघाच्या स्थापनेच्या उद्दिष्टांच्या किंवा अटींना तोडून एकात्म सरकारकडे चालू लागतात. त्यानुसार विसाव्या शतकात राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान यांच्या दबावात विकेंद्रीकरणाची व्यवस्था समाप्त होते. [18]

भारतीय संघराज्य बद्दल बोलायचे झाल्यास आत्मा एक केंद्र आणि शरीर संघात्मक असल्याचे दिसते. यात संघराज्य व्यवस्थेबाबत आवश्यक सहा लक्षणांपैकी अर्धे लक्षणे यात आहे. तर अर्धी लक्षण नाही. जसे की लिखित घटना, स्वतंत्र न्यायपालिका, केंद्रीय कायदे मंडळाचे द्वितीय सभागृहात राज्यांना प्रतिनिधित्व, लिखित अधिकारांची विभागणी हे संघराज्याची लक्षणे दिसतात तर लवचिक घटना, अधिकाराच्या विभागणित केंद्राचे पारडे अधिक मजबूत, एकेरी न्यायपालिका, एकेरी नागरिकत्व, अखिल भारतीय सेवांचे प्रभुत्व, केंद्रीय कायदे मंडळात राज्यांना असमान प्रतिनिधित्व या सर्वांमुळे भारतीय संघराज्य पूर्णपणे संघराज्यात्मक स्वरूपाची आहे. याबाबत एक लक्षात घेतले पाहिजे सामान्य परिस्थितीत भारत संघराज्य व्यवस्थेनुसार वागतो तर विशिष्ट परिस्थितीत देशाच्या एकात्मतेच्या दृष्टिकोनातून संघ ‘एकात्म व्यवस्थेसारखा’ व्यवहार करू लागतो. यामुळे आपत्कालीन परिस्थितीत संघाला सामना करण्यासाठी अधिक बळ मिळते तसेच फुटीरवादी तत्त्वांच्या विरोधात मजबूतपणे उभे राहता येते.

**भारतीय संघराज्य व्यवस्था व आपत्ती निवारणार्थ उपयोगिता व उपाययोजना :-**

वर्तमान काळात भारतीय संघराज्य स्वरूपाबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले. यामध्ये प्रामुख्याने ते सर्व राजकीय स्वरूपाचे होते. गतकाळात मजबूत केंद्र सरकारमुळे प्रादेशिक पक्षांकडून केंद्राबाबत अनेक प्रकारच्या तक्रारी होत्या . त्यानंतर जसजशी राष्ट्रीय पक्ष कमजोर होऊन प्रादेशिक पक्षांच्या आधारावर संयुक्त सरकारांचा काळ आला त्यावेळी कमजोर केंद्रीय सरकारे प्रादेशिक पक्षांच्या राजकारणामुळे जेरीस आले होते याचे उदाहरण बांगलादेश संबंधित परराष्ट्र धोरणाबाबत पश्चिम बंगाल सरकारचा हस्तक्षेप किंवा श्रीलंकेबाबत तामिळनाडूच्या राजकीय पक्षांची मनधरणी करणे यामुळे केंद्राच्या अखत्यारीत असणारा परराष्ट्र व्यवहार संबंधी अधिकार नेहमीच बाधित होताना दिसत होती परंतु वर्तमानात केवळ राजकीय समस्या नव्हे तर देशासमोर उभ्या असणाऱ्या विविध आपत्तींच्या वेळी मजबूत केंद्राची आवश्यकता जाणवते.आपत्तीचा सामना करतांना लक्ष्यात येते की, नागरिकांच्या जीवनाशी प्रत्यक्ष संबंधित असणारे अनेक विषय समवर्ती सूची मध्ये येतात. अशावेळी निर्णय घेताना मोठ्या प्रमाणात समस्या येतात. प्रादेशिक पक्ष आपल्या आडमुठेपणाने अशा स्थितीचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतात प्रादेशिक व राजकीय अस्मिता मध्ये आणतात व त्यामुळे नागरिकांना प्रत्यक्ष अशा परिस्थितीतून बाहेर काढणे, दिलासा देणे किंवा समस्यांचे निराकरण करणे यात अनेक समस्या निर्माण होतात.

आपत्ती निवारणासाठी 2005 मध्ये केंद्र सरकारकडून कायदा करण्यात आला. वेळोवेळी त्यात आवश्यक सुधारणा करण्यात आल्या परंतु प्रत्यक्षात मोठ्याप्रमाणात आपत्ती येते त्यावेळी मदतीसाठी आवश्यक असणारी केंद्रीय व्यवस्था जसे की एनडीआरएफ,सैन्यदल तुकड्या या केंद्राकडून पुरले जातात. राज्यांनी आपल्या भौगोलिक क्षेत्राच्या अनुसार उभी राहणारे आव्हानांचा सामना करण्यासाठी आवश्यक पर्यायी व्यवस्था फारशी तयार न केल्याचे दिसते. तसेच आपत्ती काळात व नंतर सातत्याने केंद्रीय सरकारकडे मोठ्या प्रमाणात निधीची मागणी केल्या जाते. जी फारशी तर्कसंगत नसते यामध्ये राजकीय लाभ घेण्यासाठी तसेच जबाबदारीचे तत्व केंद्राकडे ढकलण्याचे प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात दिसते. यातून नागरिकांचे हाल होतात अशा प्रकारच्या कुठल्याही आपत्तीमध्ये तात्काळ मदत नागरिकांना मिळत नाही.मोठ्या मनुष्य व संपत्ती ची हानी होते या सर्वांचा विचार करता भविष्यात येणाऱ्या युद्ध, नैसर्गिक आपत्ती तसेच महामारी आरोग्य विषयक समस्या यांचा मुकाबला करण्यासाठी भारतीय केंद्र व राज्य संबंधामध्ये अमुलाग्र बदल करण्याची आवश्यकता भासत आहे.

अशा राष्ट्रीय स्तरावर आपत्तीच्या प्रसंगी किंवा राज्यांना मोठ्या प्रमाणात मुकाबला करतांना आवश्यक कायद्याची गरज आहे. ज्यात,

1. केंद्र राज्याचा अश्या विपत्तीचा सामना करतांना योग्य समन्वय असेल,
2. जबाबदारी निच्छित केल्या जातील,
3. आपत्ती काळात जवाबदार यंत्रणा तत्काळ प्रभावी होतील. नागरिकांना दिलासा देतील.
4. ज्या वेळी राज्य सरकारे आपत्तीचा सामना करण्यास कुचकामी ठरतील तेव्हा केंद्र सरकार पुढाकार घेऊन अशा वेळी संबंधित मर्यादित स्वरूपाची किंवा मोठ्या प्रमाणात व्यवस्था आपल्या अधीन घेऊन कार्य करू शकेल.

एकेरी नागरिकांच्या तत्वानुसार प्रत्येक नागरिक हा संपूर्ण भारताचा नागरिक असून या जबाबदारीची निश्चिती झाली पाहिजे. यासाठी आपत्ती निवारण कायद्यामध्ये केंद्र व राज्याच्या अधिकार विभागणी संबंधी

येणाऱ्या समस्यांवर स्पष्ट असेल निर्देश तयार करणे आवश्यक आहे,जेणेकरून भविष्यातल्या आव्हानांनाचा सामना भारतीय संघ व्यवस्था करू शकेल.

**निष्कर्ष :-**

भारतीय घटनाकारांनी तत्कालीन समस्याचा विचार करिता एका मजबूत संघराज्य व्यवस्थेसह मजबूत केंद्राची कल्पना केली जी आव्हानात्मक काळात देशाची अखंडीतता टिकवेल व देशाला स्थैर्य प्रदान करतील. आज भविष्यात मोठ्या नैसर्गिक आपदा व करोना सारख्या महामारीचा विचार करिता यासाठी काही महत्वपूर्ण बदलांची आवश्यक्त आहे.ज्यामुळे नागरिकांचे जीवित केंद्र व राज्यांसाठी सर्वाधिक प्रथामिकतेवर राहील.

**संदर्भ :-**

1. बसू दुर्गादास, भारतका संविधान वाधवा प्रकाशन, नई दिल्ली, 2002, पृ. 51
2. नारंग नारायण,भारतीय शासन एवं राजनीती, गीतांजली प्रकाशन हाऊस, नवी दिल्ली २००७, पृ. 75
3. चोबे शिवानी किंकर, भारतीय संविधान प्रश्न एवं कार्य, नॅशनल बुक ट्रस्ट,दिल्ली, 2012, पृ.57
4. चोबे शिवानी किंकर , २०१२, पृ. 58
5. राजश्री भावना,लेख, भारतीय संघवाद की..... , विवेकानंद इंटरनॅशनल फाऊंडेशन सप्टेंबर 19 2019
6. राजश्री भावना,लेख, भारतीय संघवाद की..... , विवेकानंद इंटरनॅशनल फाऊंडेशन सप्टेंबर 19 2019
7. चौधरी वासुकी नाथ व कुमार युवराज भारतीय शासन और राजनीति, नवी दिल्ली, 2010,पृ.125
8. चौधरी वासुकी नाथ..,पृ.125
9. चौधरी वासुकी नाथ..,पृ.125
10. कश्यप सुभाष,हमारा संविधान, नॅशनल बुक ट्रस्ट ,2009,पृ. 66
11. कश्यप सुभाष, 2009,पृ. 66
12. कश्यप सुभाष, 2009,पृ 66
13. बसू दुर्गादास प्रकाशन 2002 पृ.52
14. बसू दुर्गादास प्रकाशन 2009 पृ. 52
15. बसू दुर्गादास प्रकाशन 2009 पृ. 56
16. फाडीया बी एल, फाडीया कुलदीप, भारतीय संघ एवं केंद्र राज्य संबंध, कैलास प्रकाशन, भोपाल 2007, पृ.1
17. डब्ल्यू एच मोरी जोन्स, व्हर्नमेंट अँड पॉलिटिक्स ऑफ इंडिया, लंडन, 1971, पृ.50
18. बी. एल. फाडीया,२०१२, कैलास पुस्तकालय भोपाल,पृ. ८